सकाळ

# कृषि उत्पन्न बाजार समिती, श्रीगोंदा

## तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

श्रीगोंदा कृषि उत्पन्न बाजार समिती, श्रीगोंदाच्या सर्व परवानाधारक आडते, व्यापारी, हमाल, प्रक्रिया करणारे, दलाल, तोलाईदार, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकान, सहकारी संस्था, किराणा दुकानदार, कांदा व भुसार, फळे व भाजीपाला खरेदी-विक्री करणारे लायसेंस धारक, गोदाम धारक, मदतनीस व घाऊक बाजार आवारात व बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात (संपूर्ण श्रीगोंदा तालुका) व्यवसाय करणाऱ्या सर्व संबंधितांना कळविणेत येते की, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ६ व ७ अन्वये आणि नियम १९६७ मधिल तरतुदी नुसार चालु बाजार वर्ष सन २०२४-२०२५ करीता घेतलेल्या लायसेंसचे पुढील सन २०२६-२०२७ (दिनांक ०१/०४/२०२६ ते ३१/०३/२०२७) या वर्षासाठी नुतणीकरण करणेसाठी संबंधित परवाना धारकांनी दिनांक ०१/०२/२०२६ ते २८/०२/२०२६ या कालावधित आवश्यक ती फी भरुन व येणे असलेल्या बाजार फी, देखरेख फी, भुखंड भाडे, इत्यादी सर्व रकमा भरुन बाजार समितीचे श्रीगोंदा मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत अर्ज करावेत. दिनांक २८/०२/२०२६ नंतर आलेल्या अर्जावर प्रती दिन शेकडा १०% प्रमाणे विलंब शुल्क आकारले जाईल.

तसेच बाजार समितीच्या येणे असलेल्या सर्व रक्कमा पूर्णपणे भरल्या शिवाय व योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच दिनांक ०१/०४/२०२६ नंतर अनुज्ञप्ती (लायसेंस) शिवाय कार्यक्षेत्रात व्यवसाय करता येणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

| राजेंद्र बा. लगड | मनिषाताई यो. मगर | प्रविण ल. लोखंडे |
|---|---|---|
| प्रभारी सचिव | उपसभापती | सभापती |

(शिक्का)

कृषि उत्पन्न बाजार समिती, श्रीगोंदा
तालुका श्रीगोंदा, जिल्हा, अहिल्यानगर.

Scanned with OKEN Scanner